क्रं.शिउसं/माध्य-४/ २४५६३-६४
शिक्षण उपसंचालक बृहन्मुंबई यांचे
कार्यालय, जवाहर बालभवन,
नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड,
मुंबई-४०० ००४
दिनांक:- 29/Aug/2001

आदेश -

माध्यमिक शाळा संहिता नियम क्र. ४.१ ने दिलेल्या अधिकाराचा वापर करुन मी शिक्षण उपसंचालक, बृहन्मुंबई ---बालभवान शिक्षण प्रसारक मंडळाचे ऑक्सफर्ड पब्लिक स्कुल, कांदिवली, मुंबई.------ या शाळेतील इ. ५वी व ८वी या वर्गांना ---इंग्रजी--- माध्यमातून कायम विना अनुदान/विना अनुदान तत्वावर ---जून २०००--- पासून/या वर्षासाठी खालील सर्व साधारण अटींवर प्रथम मान्यता देत आहे.

१) माध्यमिक शाळा संहिता नियम क्र. ३ मधील अटींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

२) मुख्याध्यापक व इतर कर्मचारी वर्ग नियमानुसार आवश्यक गुणवत्ता असणारा प्रशिक्षित व पुरेसा असावा.

३) सेवाशर्ती अनुदान संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ प्रमाणे वेळोवेळी करण्यात येणा-या बदलानुसार असाव्यात.

४) व्यवस्थापनाचे निर्धारित करावयाची वेतनश्रेणी व भत्ते शासनाने अशासकीय अनुदानपात्र माध्यमिक शाळांसाठी वेळोवेळी निर्धारित केलेल्या वेतनश्रेणी व भत्ते यापेक्षा कमी असू नयेत.

५) कर्मचा-यासाठी अंशदायी भविष्य निर्वाह निधीची योजना सुरु करण्यात यावी.

६) खात्याच्या पुर्व परवानगी शिवाय जादा वर्ग उघडण्यात येऊ नयेत.

७) शिक्षणाचा स्तर, शिक्षणाच्या सोई आरोग्यविषयक सुविधा प्रमाणित केल्याप्रमाणे असाव्यात.

८) वार्षिक परीक्षेचे निकाल तयार करतांना खात्याने दिलेल्या नियमांचे पालन करावे ( एक वर्गातून वरच्या वर्गात बदती देतांना खात्याचे निर्धारित केलेल्या नियमांचे पालन करावे ).

९) शैक्षणिक फी चे दर कार्यबळ गटाकडुन मान्य करुन घेणे आवश्यक आहे.

१०) शाळेचे दप्तर सुयोग्य अधिका-यांनी तपासणीसाठी मागणी करताच तात्काळ उपलब्ध करण्यात यावे.

११) नियमाप्रमाणे मागासवर्गीय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नेमणूका करण्यात याव्यात व शासनाच्या आदेशाप्रमाणे वेळोवळी दिलेल्या सुचना नुसार मागासवर्गीयांचे रजिस्टर (रोस्टर) ठेवण्यात यावे. तसेच मंजूर शिक्षकांच्या जागेवर फक्त प्रशिक्षित शिक्षकच नेमावेत. शाळा प्रवेशाबाबत खात्यास सहकार्य द्यावे.

१२) महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ नुसार शालेय कर्मचारी वर्गाची सेवापुस्तके, गुप्त अहवाल, शिक्षण व शिक्षकेतर कर्मचा-यांची सेवाजेष्ठता सूची ठेवण्यात यावी. शाळा समितीची स्थापना करावी व शालेय समितीच्या वर्षातून किमान ६ सभा घ्याव्यात व इतिवृत्त तयार ठेवावे.

१३)महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम ११.२ अन्वये सेवापुस्तकातील कर्मचा-यांच्या जन्मतारखेची नोंद शाळा सोडल्याचा मुळ दाखला, माध्यमिक शाळांतील प्रमाणपत्र, वैद्यकीय तपासणीचे प्रमाणपत्र यांच्या मुळ प्रतीवरुन पडताळणीनंतर मुख्याध्यापक यावर सही करुन तारीख घालतील.

१४) शासन व शिक्षण खाते यांनी वेळोवळी दिलेल्या सूचनांप्रमाणे शालेय शिक्षण व प्रशासकीय कारभार करावा लागेल. खात्याच्या आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.

१५) कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थी किंवा पालकांकडून देणग्या घेण्यात येऊन नयेत. अन्यथा महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) कायदा १९८७ मधील तरतूदीनुसार शाळेची मान्यता काढुन घेण्यात येईल.

१६)माध्यमिक शाळा संहितेतील तरतूदी व महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील सर्व सेवाशर्ती मान्य राहतील या अटीवर प्रथम मान्यता देण्यात येईल.

१७) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) कायदा १९८७ अंमलात दि. १५.४.८८ ला आला आहे. या कायद्यातील तरतूदीचे संस्थेने/शाळेने भंग केल्यास शाळेला दिलेली मान्यता रद्द करण्यात येईल.

१८) शाळेतील विद्यार्थी संख्या माध्यमिक शाळा संहिता नियम १३ अन्वये असेल.

१९)शिक्षकांना देण्यात येणारा कार्यभार (वर्कलोड) माध्यमिक शाळा संहितेमधील तरतूदीप्रमाणे असावा.

२०) शिक्षकांची शैक्षणिक अर्हता माध्यमिक शाळा संहितेमधील नियम क्रमांक २ प्रमाणे किंवा वेळोवेळी बदलेल्या नियमाप्रमाणे असणे आवश्यक आहे.

२१)एस.एस.सी. मंडळ नियमावली नियम क्र. २८(१) अन्वये विहित नमुन्यातील अर्ज मंडळाकडून घेतल्या जाणा-या अंतिम परीक्षेसाठी ज्या वर्षी उमेदवार पाठविण्याचे योजिले असेल, त्या वर्षाच्या दोन वर्षे अगोदरच्या १५ जुलै पेक्षा उशिरा नरोल अशावेळी प्रथमच मान्यतेसंबंधी अर्ज मंडळाकडे सादर करणे आवश्यक आहे.

२२) तपासणी अहवालातील त्रुटींची व सूचनांची पूर्तता करण्याच्या अटींवर वरील मान्यता देण्यात येत आहे.

२३) माध्यमिक शाळा संहिता नियम ४.२ अन्वये शाळेस परवानगी मिळाल्यापासुन पाचव्या वर्षी कायम मान्यता घेणे आवश्यक आहे.

शिक्षण उपसंचालक,
बृहन्मुंबई

प्रत - मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका/प्राचार्य,
ऑक्सफर्ड पब्लीक स्कुल,
कांदिवली [पश्चिम], मुंबई ६७.

प्रत - शिक्षण निरीक्षक (दक्षिण/उत्तर/पश्चिम) बृहन्मुंबई ०७/७१/६०.
यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.

वरील अटींबाबत आपला अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा. तसेच वरीलप्रमाणे सदर शाळा कळविण्यात यावे.